जळगाव प्रतिनिधी (दि. १६ ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पुरुष मलखांब संघाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ मलखांब स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत रौप्य पदक पटकावले आहे. कुलगुरू प्रा. व्ही एल माहेश्वरी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत आगामी स्पर्धांसाठी अधिक मेहनत घेण्याचा सल्ला देत खेळाडूंशी चर्चा करत स्पर्धेतील अनुभव जाणून घेतले. तसेच विद्यापीठाकडून खेळाडूंना सर्वतोपरी सहकार्य व सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील, असे आश्वासनही त्यांनी दिले. तसेच या यशामुळे विद्यापीठाच्या क्रीडा कामगिरीत भर पडली असून, उत्तर महाराष्ट्रातील तरुण खेळाडूंना प्रेरणा मिळाली असल्याचे ते म्हणाले.

विनायका मिशन फाऊंडेशन आणि रिसर्च विद्यापीठ, चेन्नई येथे नुकत्याच पार पडलेल्या या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत देशभरातील तब्बल ७२ विद्यापीठांनी सहभाग नोंदविला होता. या अत्यंत चुरशीच्या स्पर्धेत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघाने उत्कृष्ट समन्वय, शारीरिक ताकद, लवचिकता आणि कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत अंतिम फेरीत धडक मारली. अंतिम फेरीत त्यांनी दमदार खेळ करत रौप्य पदकावर आपले नाव कोरले.

विद्यापीठाच्या या यशस्वी संघामध्ये सचिन किशारे जोहरे (पी. ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ), सागर किशारे चौधरी (जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲण्ड मॅनेजमेंट, जळगाव), सारंग जगदिश मालपुरे (के. सी. ई. संस्थेचे शा.-शि. महाविद्यालय, जळगाव), तुषार कैलास जोहरे (पी. ओ. नहाटा महाविद्यालय, भुसावळ), आकाश रविंद्र ठाकरे (एस. एस. व्ही. पी. एस. विज्ञान महाविद्यालय, धुळे), सचिन आनंदा गवळी (झेड. बी. पाटील महाविद्यालय, धुळे) या खेळाडूंनी समावेश असून त्यांनी स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी केली. या यशाबद्दल विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी, प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे तसेच कुलसचिव डॉ. विनोद पाटील यांनी सर्व खेळाडूंचे, प्रशिक्षकांचे व संघ व्यवस्थापनाचे मनःपूर्वक अभिनंदन केले. अशी माहिती क्रीडा संचालक डॉ.दिनेश पाटीली यांनी दिली.

**बातमी नं. २**

जळगाव प्रतिनिधी (दि. १६ ) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथील भाषा अभ्यास प्रशाळा व संशोधन केंद्रात 'प्राध्यापक प्रबोधिनी अंतर्गत कार्ल मार्क्स, मार्क्सवाद, भारतातील मार्क्सवाद' या विषयावर प्रशाळेतील प्राध्यापक कृष्णा संदानशीव यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या कार्यक्रमप्रसंगी प्रशाळेचे संचालक माननीय प्रा. डॉ.म.सु. पगारे अध्यक्षस्थानी होते.

कृष्णा संदानशीव यांनी त्यांच्या व्याख्यानाची विभागणी चार विभागात करून, पहिल्या विभागात कार्ल मार्क्स यांच्या जीवनाविषयी ते त्यांच्या कम्युनिस्ट मॅन्युफॅस्टो 1848 या पुस्तकापर्यंतचा प्रवास कथन केला तर, दुसऱ्या टप्प्यात मार्क्सवादी संकल्पना, पाया, विचार प्रणाली, अधिसत्ता, सुपरस्ट्रक्चर, ते दासकॅपिटल 1864 व भांडवलशाही इत्यादींवर त्यांनी सखोल मांडणी केली. तिसऱ्या भागात मार्क्स आणि भारत, मार्क्स ची प्रासंगिकता, भारतातील मार्क्स वादाचा इतिहास जात, वर्ग यावर मार्क्सचे विश्लेषण आणि श्रम आणि श्रमिकांचे विभाजन या बाबींचे सविस्तर विश्लेषण केले. तर चौथ्या भागात डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि मार्क्स यांचा तुलनात्मक अभ्यास, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मार्क्स विषयी विचार तसेच बाबासाहेबांनी बी.बी.सी. ला दिलेली मुलाखत दृकश्राव्याच्या माध्यमातून दाखवली. तसेच, रानडे, गांधी आणि जिना, बुद्ध आणि कार्ल मार्क्स, स्टेट अँड

मायनॅरिटीज, कास्ट इन इंडिया, मार्क्सवाद व आंबेडकरवाद आणि बुद्ध व कार्ल मार्क्स या पुस्तकातील संदर्भ देत सविस्तर चर्चा घडवून आणली.

विश्वकल्याणाचे गृहीतक आंबेडकर वादात आहे. आंबेडकरवादाचा महत्त्वाचा स्तंभमानवतावाद व विवेकवाद असल्याने कुठलेही आव्हान आंबेडकरवाद स्वीकारतो म्हणूनच आंबेडकरवाद हा अद्वितीय व सर्वसमावेशक आहे असे विधान कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. डॉ. म.सु.पगारे यांनी केले. मार्क्सवाद हा आंबेडकरवादातील छोटासा किरण आहे. तात्कालीन परिस्थितीत प्रसंगावधानता आणून कुठल्याही काल्पनिकतेमध्ये न राहता सत्याला स्पर्श करणे अनिवार्य ठरते आणि त्यासाठी आंबेडकरवादाची अत्यावशकताआहे असेही ते म्हणाले. मार्क्सवादातून भांडवलशाहा उभा राहण्याची शक्यता असते तर आंबेडकरवादातून खरा माणूस तयार होतो असे विधान त्यांनी आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त केले.

डॉ. दीपक खरात यांनी कार्ल मार्क्सचे सिद्धांत, श्रम आणि श्रमिकांचे जातीनिहाय विभाजन यावर प्रश्न उपस्थित केले व त्यावर सखोल चर्चा केली. कार्यक्रमासाठी भाषा अभ्यास प्रशाळेतील सहाय्यक प्राध्यापक डॉ. दीपक खरात, डॉ. प्रीती सोनी, डॉ. सुदर्शन भवरे, कृष्णा संदानशिव, डॉ. भारती सोनवणे, प्रीती मनुचारी, प्रतिभा गलवाडे, नेहा लाम्हणे, पल्लवी, जितेंद्र नाईक, संशोधक विद्यार्थी खेमराज पाटील, महेश सूर्यवंशी इ. उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती मनुचारी यांनी तर आभार खेमराज पाटील यांनी केले.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक: १६ डिसेंबर, २०२५

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता